# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे – ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक:०२०-२५६२१२०५

Telephone No.: 020-25621205

Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग

P.G. Admission Section

Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक : ८९ / २०२६

**विषय :– " महाविद्यालय/परिसंस्था यांनी शुल्काची माहिती संकेतस्थळावर/सूचना फलकावर प्रसिद्ध करणेबाबत..."**

**संदर्भ :– मा.प्रभारी शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/प्रवेश शुल्काबाबत/मवि–१/२०२६/ई./६८४, दि. १३ मे, २०२६ रोजीचे पत्र.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मा. प्रभारी शिक्षण संचालक यांनी संदर्भीय पत्रामध्ये नमुद केले आहे की, नुकताच उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (इ. १२ वी) चा निकाल जाहीर झाला असून सर्व महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे/होत आहे. त्याअनुषंगाने प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेताना विद्यापीठ/शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या नियमानुसार व मान्यतेनुसार प्रवेश शुल्क जसे की, टयुशन फी, डेव्हलपमेंट फी आणि इतर (Other fee) शुल्काबाबतची अद्यावत माहिती महाविद्यालयाच्या दर्शनी भागात सूचना फलकावर लावणे अनिवार्य करण्यात यावे, तसेच सदर प्रवेश शुल्काबाबतची संपूर्ण माहिती (शुल्कासहित) महाविद्यालयाचे प्रवेश माहिती पुस्तिकात (Prospectus) असणे आवश्यक असल्याचे अनिवार्य करण्यात येत आहे. सूचना फलकावरील प्रवेश शुल्काबाबतची माहिती आणि प्रवेश माहिती पुस्तिकेतील शुल्काबाबतची माहिती सर्व प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेशापूर्वी माहिती करून देणे ही जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची/परिसंस्थेची राहील. तसेच सदर शुल्काबाबतची माहिती सुचना फलक आणि प्रवेश माहिती पुस्तिकेमध्ये दिल्याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेची राहील.

या परिपत्रकाद्वारे सर्व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था यांना सुचित करण्यात येते की, विद्यापीठाने/शुल्क नियामक प्राधिकरणाने ठरविलेले अभ्याक्रमनिहाय शुल्क आपल्या महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर तसेच सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात यावे. तसेच यासंदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार उद्‌भवणार नाही याची दक्षता संबंधित महाविद्यालय/परिसंस्थांनी घ्यावी.

विद्यार्थ्यांकडून अनधिकृत किंवा अधिक फी गोळा केल्याचे निदर्शनास आल्यास किंवा याबाबतची तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित महाविद्यालय/परिसंस्था यांच्यावर सन २०१९ चा एकरूप परिनियम क्र. १ (कसूरदार संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्यावर लादावयाची शास्ती) मधील नियम क्र. २ (७) अन्वये कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

या परिपत्रकाची पुर्तता केल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र संबंधित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या **BOD Login** मधून ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात यावे.

गणेशखिंड पुणे – ७<br>
संदर्भ : शै. प्रवेश/२३४८<br>
दिनांक :१५/०५/२०२६

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)<br>
उपकुलसचिव,

**प्रतः**

मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.

D:\Vishnu\MAHADBT Circular 2022-23.docx

# महाराष्ट्र शासन

## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९


क्र. उशिसं/प्रवेश शुल्काबाबत/मवि-१/२०२६/ई. 1684 दि. मे.२०२६ 13 MAY 2026

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण

२. कुलसचिव,
राज्य सार्वजनिक विद्यापीठे

विषयः- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन प्रवेश शुल्क माहितीबाबत.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, नुकताच उच्च माध्यामिक शिक्षण मंडळ ( इ.१२ वी) चा निकाल जाहिर झाला असून सर्व महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रकिया सुरू झाली आहे/होत आहे. त्यानुषंगाने प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेताना विद्यापीठ/ शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या नियमानुसार व मान्यतेनुसार प्रवेश शुल्क जसे की, टयुशन फी, डेव्हलपमेंट आणि इतर (other fee) शुल्काबाबतची अद्यावत माहिती महाविद्यालयाच्या दर्शनी भागात सूचना फलकावर लावणे अनिवार्य करण्यात यावे, तसेच सदर प्रवेश शुल्काबाबतची संपूर्ण माहिती (शुल्कासहित) महाविद्यालयाचे प्रवेश माहितीपुस्तिकात (Prospectus) असणे आवश्यक असल्याचे या पत्राद्वारे अनिवार्य करण्यात येत आहे. सुचना फलकावरील प्रवेश शुल्काबाबतची माहिती आणि प्रवेश माहिती पुस्तिकेतील शुल्काबाबतची माहिती सर्व प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेशापूर्वी माहिती करुन देणे ही जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.

सदर शुल्काबाबतची माहिती सुचना फलक आणि प्रवेश माहितीपुस्तिकेमध्ये दिल्याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठ आणि संबंधित विभागीय सहसंचालक यांची राहील.

तरी सर्व संबंधित विभागीय सहसंचालक आणि कुलसचिव, सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे यांनी सदर बाब आपल्या अधिनस्त आणि संलग्नित महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन तात्काळ सूचित करण्यात यावी. तसेच यासंदर्भात कोणत्याही प्रकराची तक्रार उद्भवणार नाही याची दक्षता संबंधित महाविद्यालयांनी घ्यावी. तसेच कोणत्याही प्रकराची तक्रार उदभवल्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील.

( डॉ. शैलेंद्र देवळाणकर )
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

प्रतः-१. मा.स्वीय सहाय्यक मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य
२. मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग , मंत्रालय विस्तार भवन, मुंबई